# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ २९६९/२०१९, पुणे शहर, दिनांक २२.०३.२०१९

**विषय - दिनांक. २३.०३.२०१९ रोजी तिथीप्रमाणे शिवजयंती मिरवणुकीचे वेळी वाहतूक व्यवस्थेतील बदला बाबत.**

---------------oo---------------

दिनांक २३.०३.२०१९ रोजी, तिथी प्रमाणे श्री.छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने पुणे शहरात विविध संघटनांकडून मिरवणुकांचे आयोजन करण्यात येते. सदर मिरवणूकी दरम्यान वाहतुकीची कोंडी होऊ नये, वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, पंकज देशमुख,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन आवश्यकत्तेप्रमाणे खालील मिरवणूक मार्गावरील वाहतुक बंद/डायव्हर्शन बाबतचे आदेश निर्गमित करीत आहे.

## १) मुख्य मिरवणूक मार्ग

**मिरवणूक मार्ग -** भवानी माता मंदीर, भवानी पेठ येथून सुरु होवुन रामोशी गेट चौक - नेहरु रोडने - ए.डी.कॅम्प चौक - संत कबीर चौक - नानाचावडी चौक - अरुणा चौक - नानापेठ चौकी - अल्पना टॉकिज - डुल्या मारुती चौक - हमजेखान चौक - सतरंजीवाला चौक – तांबोळी मशिद चौक - सोन्या मारुती चौक - मोती चौक फडके हौद चौक - जिजामाता चौक - लालमहल चौक पुणे येथे विसर्जन होणार आहे.

## २) मुख्य मिरवणुक मार्ग डायव्हर्शन

३. **अ)** नेहरू रोड वरील वाहतूक बंद केल्यानंतर पॉवर हाऊस कडुन सेव्हन लव्हज कडे जाणा-यांनी कादर चौक- क्वार्टर गेट चौक - जुना मोटार स्टॅन्ड मार्गे जावे किंवा पॉवर हाऊस ते समर्थ पोलीस ठाणे ते शांताई हॉटेल ते क्वार्टर गेट या मार्गाचा वापर करुन जुना मोटर स्टँडकडे जावे.

**ब)** तसेच सेव्हन लव्हज चौका कडुन पॉवर हाऊस कडे जाणा-यांनी बाहुबली चौक राजसबाई गंगाळे पथ मार्गे जुना मोटार स्टॅन्ड - क्वार्टर गेट मार्गे जावे.

४. **अ)** लक्ष्मी रोडवरील वाहतूक बंद केल्यानंतर टिळक चौकाकडे जाणा-यांनी नेहरू रोड - पॉवर हाऊस चौक - अपोलो टॉकीज - फडके हौद - जिजामाता चौक मार्गे जावे.

**ब)** तसेच देवजी बाबा चौकाकडुन मिठगंज चौक मार्गे स्वारगेट कडे जाणा-यांनी देवजीबाबा चौक ते दारुवाला पूल ते अपोलो सिनेमा ते पॉवर हाऊस चौकातुन नेहरू रोडचा वापर करावा.

५. **अ)** गणेश रोडवरील वाहतूक बंद केल्या नंतर जिजामाता चौकाकडे जाणा-यांनी देवजी बाबा चौक - हमजेखान चौक व लक्ष्मी रोडचा वापर करावा.

**ब)** जिजामाता चौकातून फडके हौद चौकाकडे जाणा-यांनी गाडगीळ पुतळा - कुंभार वेस मार्गे किंवा